**नि.फौ.ख.क्र.४५/२०१९**
**शासन वि. इजाज अहमद**
**नि.क्र. ७५**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.९**

नावः टिकाराम ठाकूर जाधव,

वयः ५४ वर्ष, धंदाः पो.उप.नि.

पत्ताः पो.स्टे. देवलापार, जि. नागपूर

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र. ९ याचा सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस. व्ही. तलमले यांच्यामार्फत शपथेवर सुरुः**

**१.** मी सन २०१५ ते २०१९ या काळात पो.ह. या पदावर पो.स्टे. पारशिवणी येथे कार्यरत होतो. मी दोन्ही आरोपीला ओळखतो. मला अपराध क्र. १४२/२०१७ चा तपास प्राप्त झाला होता. तपासासोबत मला केस डायरी प्राप्त झाली होती. तोंडी रिपोर्ट, एफ. आय. आर., शेतीची ७/१२ ची प्रत, व इतर दस्त मिळाले होते. तपासादरम्यान पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. घटनास्थळ पंचनाम्याकामी पंचाना नोटीस दिली होती. आता मला नोटीसची प्रत दाखविली त्यावर माझी व पंचाची सही आहे, त्यातील मजकूर खरा आहे. त्यास **नि. क्र. ७६** देण्यात येते. आता मला घटनास्थळ पंचनामा **नि. क्र. ६०** दाखविला त्यावर माझी व पंचाची सही आहे, त्यातील मजकूर खरा आहे. तपासारम्यान साक्षीदाराचे बयाण नोंदविले.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपी क्र.१ व २ तर्फे श्री पी. एस. सायरे वकील साहेब यांच्यामार्फत उलटतपास शपथेवर सुरुः–**

२. हे म्हणणे खरे आहे की, या अपराधातील तपासकामी लेखी आदेश प्राप्त झाला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, रिपोर्ट देण्यास विलंब झाल्याचे कारण

दोषारोपपत्रात नमूद करावे लागते.

प्रश्न – या प्रकरणात अपराध काय आहे ?

उत्तर – आरोपींनी धुऱ्यावरील झाडे तोडून चोरुन नेण्याचा अपराध केला आहे.

प्रश्न – घटनास्थळी झाडे होते या बाबत तपास केला होता काय ?

उत्तर – मी तपास केला होता.

प्रश्न – घटनास्थळी झाडे होते याबाबत कोणते दस्त प्राप्त केले

उत्तर – ७/१२ उताऱ्याची प्रत प्राप्त केली.

हे म्हणणे खरे आहे की, तपासादरम्यान तलाठी , पटवारी यांची बयाण नोंदविले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकारणात चोरी गेलेला मुद्देमाला जप्त झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटा घटनास्थळ पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा गुन्ह्याशी काही संबंध नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2025.08.26 14:57:43 +0530

**(जी.ओ. वानखडे)**

न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

समक्ष,

GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2025.08.26 14:57:47 +0530

**(जी.ओ. वानखडे)**

न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

दिनांकः २६/०८/२०२५